**नियमित दिवाणी दावा क्र.२४/२०२१ मध्ये नि.क्र.२८ वर आदेश.**

मालती मधुकर शेटये.

वि.

शंकर धोंडु तवसाळकर–८.

(**सीएनआर क्र.MHRG-13000-414-2021.**)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त नेमणुकीकरता दाखल केला आहे.

०२. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गावठाण क्र.१/१३९ व त्यामध्ये घर क्र.५९० चे घर आहे. सदर मिळकतीस खालील प्रमाणे चतुःसिमा आहेत.

| | | |
|---|---|---|
| पुर्व. | – | गावठाण नं.१/१३८ ची मिळकत. |
| पश्चिम. | – | रस्ता. |
| दक्षिण. | – | १/१४३ ची मिळकत. |
| उत्तर. | – | रस्ता. |

०३. सदरचा दावा वादीने प्रतिवादीं विरुध्द जाहीरनाम्या करीता / डीक्लरेशन करीता, निरंतर तुर्तातुर्त ताकीदीच्या हुकूमा करीता, मॅन्डेटरी हुकूमा करीता / अनिवार्य आदेशा करीता, बेकायदेशीर अतिक्रमण काढुन मिळण्या करीता दाखल केलेला आहे.

०४. वादी यांनी दाव्यात पुढील प्रमाणे मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी वादीचा जो जाणे येणेचा वहिवाटीचा मार्ग बंद केलेला आहे तो पुन्हा खुला करुन दयावा. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी स्वतःच्या घराचे जे बांधकाम वादीच्या वहिवाटीच्या रस्त्यावर केले आहे ते पाडण्या विषयी प्रतिवादी क्र.९ यांना आदेश देण्यात यावा. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादी यांच्या वहिवाटीच्या जाणे येणेच्या रस्त्या वरती इतर कोणतेही बदल करु नये असा तुर्तातुर्त आदेश देण्यात यावा.

०५. या कामी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करावी अशी विनंती वादी यांनी केली आहे. तसेच दावा मिळकतीत प्रतिवादींनी वादीचा जाणे येणेचा वहिवाटीचा मार्ग बंद केलेला आहे किंवा कसे, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी स्वतःच्या घराचे बांधकाम वादीच्या वहिवाटीच्या रस्त्यावर केले आहे किंवा कसे, वादीचा वहिवाटीचा जाणे येणेचा मार्ग बंद केला आहे किंवा कसे याबाबतचा नकाशा अहवालासह मा. न्यायालयात दाखल करण्याचा हुकूम व्हावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०६. प्रतिवादी तर्फे वकीलांनी सदर अर्जावर मोजणीस हरकत नसल्या बाबत व सदरचा अर्ज मंजूर होण्याबाबत हरकत नसल्या बाबत म्हणणे दाखल केले आहे.

०७. अर्जाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांनी त्यांच्या कथनांप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

०८. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण दुरु करुन दावा मिळकती जाणे येण्यासाठी रस्ता खुला करुन होणे बाबत जाहीरनामा होवुन मिळण्याकरीता, निरंतर तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरीता, मॅन्डेटरी / अनिवार्य आदेशा करीता दाखल केल्याचे दिसून येते. वादींच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांच्या येण्या जाण्याचा वहिवाटीचा मार्ग बंद केलेला आहे तो खुला करुन मिळण्याची विनंती वादी यांनी केल्याचे दिसून येते. दावा मिळकती मधील सदयस्थितीतील वस्तुस्थिती पटलावर येणे आवश्यक आहे.

०९. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी त्यांच्या घराचे बांधकाम करत असताना वादी यांचा जाणे येण्याचा वहिवाटीचा मार्ग अतिक्रमण करुन बंद केला आहे किंवा कसे ही बाब योग्य त्या व्यक्ती मार्फत पटलावर येणे आवश्यक आहे. ही बाब पटलावर आल्याने कोणत्याही बाजुचे नुकसान होणार नाही. याउलट दाव्याच्या योग्य निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी मदत होणार आहे. तसेच आयुक्ताची साक्ष व उलटतपास घेण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना आहेच. दोन्ही पक्षांनी त्यांचे लेखी व तोंडी पुरावे योग्य त्या वेळेस सादर करुन आयुक्तांच्या अहवालाबाबत म्हणणे / आक्षेप नोंदवून पुढील कारवाई करु शकतात. त्यामुळे सदरचा अर्ज वादीच्या मागणी प्रमाणे मंजूर होण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. तसेच सदरचा दावा अतिक्रमण दुर करुन मिळण्यासाठी असल्यामुळे आयुक्त नेमणुकीची बाब महत्वाची ठरते. आयुक्तांच्या अहवाला खेरीज दावा पुर्णपणे गुणदोषावर निर्णयीत झाला असे म्हणता येणार नाही. आयुक्त नेमणुकीची बाब दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत पोहचण्यासाठी महत्वाची दिसून येते.

१०. सदर प्रकरणातील मिळकत ही मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन येथील असल्याने सदर कामी न्यायालयीन आयुक्त म्हणून उप अधिक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची नेमणुक करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणास्तव मी या कामी न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करीत आहे. त्यामुळे या प्रकरणी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे मार्फत सदरची मोजणी होणे गरजेचे आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.२८ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्रीवर्धन यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

०३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील वादी यांची गावठाण नं.१/१३९, क्षेत्र ०–००–८० याची मोजणी करुन सदर दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी स्वतःच्या घराचे बांधकाम वादीच्या वहिवाटीच्या रस्त्यावर केले आहे किंवा कसे, वादीचा वहिवाटीचा जाणे येणेचा मार्ग बंद केला किंवा कसे याबाबत अतिक्रमण दर्शविणे व त्या बाबतच्या खुलासा सहीत वस्तुस्थिती दर्शविणारा नकाशा तयार करुन सादर करावा.

०४. वादी यांनी न्यायालयीन आयुक्ताचे मोजणी शुल्क हे परस्पर अदा करावे व कागदपत्रांची पुर्तता करावी.

०५. येणे प्रमाणे प्राधिलेख काढण्यात यावे.

०६. न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक २९/०१/२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी अहवाल सादर करावा.

०७. येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( सो. दि. जवळगेकर )
दिनांक – २०/१२/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, श्रीवर्धन.